रयत शिक्षण संस्थेचे,

# राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर.

## मराठी विभाग 2019-20

## पल्स पोलिओ अभियानात सक्रीय सहभाग अहवाल

दि.१९ जानेवारी २०२०

रयत शिक्षण संस्थेच्या राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज मधील मराठी विभागाने दि.१९/०१/२०२० रोजी पल्स पोलिओ अभियानात सक्रीय सहभाग घेऊन जनजागृती केली. पेठवडगाव ता.हातकणंगले येथील शिवाजीनगर मधील 'साई मंदिर' येथे सहभाग घेतला. या पल्स पोलिओ अभियानांतर्गत पोलिओ बुथ वर १ ते ५ वर्ष वयोगटातील मुलांना पोलिओ डोस देण्यात मदत करण्यात आली. याबरोबरच येथील बुथवर येणाऱ्या मातांना लहान मुलांच्या आरोग्याविषयी मार्गदर्शन ही करण्यात आले. लहान मुलांच्या दृष्टीने हा पोलिओ डोस खूपच महत्त्वाचा असल्याचे त्यांच्या मातांना पटवून देण्यात आले. लहान मुलांच्या आरोग्याची काळजी घेत असताना आपण नेमकी कोणती दक्षता घ्यावी याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. या पल्स पोलिओ अभियानात परिसरातील लहान मुलांना एकत्र करून डोस घेण्यासाठी मदत करण्यात आली. मराठी विभागाच्या या अभियानातून महानगरपालिकेच्या आरोग्य कर्मचाऱ्याना मदत झाली.

या उपक्रमामध्ये मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.सिंधू आवळे तसेच विभागातील सहाय्यक प्रा.अंकुश घुले आणि विद्यार्थी श्री.ओमकार माने, श्री.सौरभ चव्हाण, श्री.प्रवीण ऐवाळे, श्री.सचिन जाधव, श्री.राजेश लोखंडे या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. याप्रसंगी पोलिओ बुथवर एकूण १९२ लहान मुलांना पोलिओ डोस देण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी महाविद्यालयाचे व मराठी विभागाचे आभार व्यक्त केले. सामाजिक बांधिलकी जपण्याचे महत्त्वपूर्ण कार्य आपल्या हातून झाले अशी भावनाही उपस्थित आरोग्य अधिकाऱ्यानी बोलून दाखवली. या उपक्रमासाठी महाविद्यालयचे प्राचार्य डॉ.एस.टी. साळुंखे यांनी मार्गदर्शन व प्रेरणा दिली.

RAJARSHI CHHATRAPATI SHAHU COLLEGE ★ KOLHAPUR

प्रा.डॉ.सिंधू आवळे
प्रमुख, मराठी विभाग